

# ख्याल गायकीची निरनिराळी घराणी

## Chapter- 4




भारतीय संगीताचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे ते परंपरेने चालत आलेले आहे. प्राचीन काळी जेव्हा मुद्रणकला अस्तित्वात नव्हती तेव्हापासून केवळ कुशाग्र बुद्धी, स्मरणशक्ती, एकाग्रता आणि मेहनत यांच्या बळावरच ही कला जतन झालेली आहे. एक गुरू अथवा उस्ताद, त्यांची मुले आणि इतर शिष्य, त्या मुलांची अगर शिष्यांची वंशपरंपरा व शिष्यपरंपरा अशा अनुक्रमाने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे ही कला जतन करून ठेवण्यासाठी सुपूर्द केली गेली. आणि अशा रीतीने ही कला उत्तम जोपासली गेली याचे मुख्य कारण म्हणजे कुठल्याही गुरूने आपल्या शिष्यांना अगर मुलांना विद्या देताना ते ती उत्तम रीतीने जतन करून ठेवतील अशी पक्की खात्री झाल्यावरच दिलेली आहे आणि अशा शिष्यांपैकी बहुतेकांनी त्या कलेचा शिस्तीने, एकनिष्ठेने प्रचार केला आहे या शिष्यांपैकी अगर गुरूपुत्रांपैकी एखादा प्रतिभावान आणि बंडखोर असा निपजतो की, तो पूर्वापार चालत आलेल्या पिढीजात गायन वैशिष्ट्यामध्ये, अंधश्रद्धेच्या दृष्टीकोनाला धुडकाऊन देऊन सुधारणा घडवून आणतो. अर्थात त्या घराण्यातील कर्तृत्ववान कलावंतांच्या कलेचा संस्कार त्याच्यावर लहानपणापासूनच झालेला असतो. इतर घराण्यांमध्ये आढळणारी निवडक उत्तमोत्तम वैशिष्ट्ये तो उदार मनाने अंगिकारतो आणि त्यामुळे त्याचे गायन वैशिष्ट्यपूर्ण व प्रगल्भ होते. असे करताना त्याची परंपरागत घरंदाज शैलीहून निराळी अशी एक खास शैली निर्माण होते. त्याची शिष्यावळ वाढते आणि कालांतराने त्याच्या जन्मगावाचे अथवा त्याचे वास्तव्य असलेल्या गावाचे नांव त्या घराण्याला दिले जाते. अशा तऱ्हेने एका घराण्यातून दुसऱ्या घराण्याचा जन्म होतो.



आपल्याकडील जुन्या कलावंतांना गुरूकडून विद्या

मिळविताना अतिशय कष्ट करावे लागत. या खडतर कष्टांचा राग ते आपल्या शिष्यांवर काढत आलेले आहेत. या गुरुशिष्यसंबंधांबद्दल पु. ल. देशपांडे यांनी आपले मत फार मजेशीर-रीत्या प्रगट केले आहे. ते म्हणतात, 'गुरुशिष्य संबंधाचे कोणी कितीही गोडवे गाइले, तरी प्रत्यक्षात ते नाते सासूसुनेसारखेच असे. क्वचित काही अपवाद सोडले तर शिष्य म्हणजे फुकटात राबणारा गुलाम. त्यातून बहुतेक शिष्य गुरुदक्षिणा श्रमरूपानेच देऊ शकत असत. आमच्या सासूबाईंनी आम्हाला छळले, म्हणून आम्ही आमच्या सुनेला छळणार असा कायदा इथेही असे.'

कित्येक गुरूंनी आपली विद्या, आपला शिष्य आपल्याहून सवाई होईल ह्या भीतीने त्याच्यापासून लपवून ठेवली. कित्येक चांगले उस्ताद आपली कला कुणालाच न देता किंवा चांगली शिष्यपरंपरा निर्माण न करताच परलोकवासी झाले. त्यामुळे ती गायकी त्यांच्या बरोबरच मिटली. आपल्या घराण्याची कला जतन करून ठेवण्या-ऐवजी दुसऱ्या घराण्याला विशेषत: त्या घराण्यातील व्यक्तींना कमी लेखण्याची आणि घराण्याघराण्यातील तेढ वाढवीत-राहण्याची त्यांना पिढीजात सवय झालेली होती. कित्येक गायक आपला रियाज दुसऱ्या कोणा कलाकारासमोर करीत नसत. तसेच दुसऱ्या घराण्यातील शिष्य आपल्याकडे शिकण्यास आले असता एक तर ते त्यांना शिकविण्याचे नाकारीत, किंवा हात राखून विद्या देत.




घराण्या-घराण्यांमधील ह्या तेढीमुळे नुकसान झाले तरी एक फायदा असा झाला की, कलावंतांमध्ये स्पर्धा निर्माण होऊन ईर्ष्येने आणि जिद्दीने रियाझ-मेहनत करून ते नांवारूपाला आले.

मोंगलांच्या ऱ्हासानंतर अर्थात १८ व्या शतकानंतर संपूर्ण भारत ब्रिटिशांच्या ताब्यात गेला. या वेळेपावेतो ध्रुपदगायकी निस्तेज होऊन ख्यालगायकी लोकप्रिय झालेली होती. ख्यालगायनाच्या या प्रभावी काळांत भारताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थितीत क्रांतिकारी परिवर्तन झाले कारण सत्ता परकयांच्या हातांत गेली होती.

इंग्रजांना भारतीय शास्त्र व कला यांमध्ये अजिबात स्वारस्य नव्हते. त्यांनी भारतीय संगीताकडे नेहमी तिरस्काराच्या दृष्टीनेच पाहिले. इंग्रज शासनाकडून भारतीय कला व शास्त्र यांना कधीच उत्तेजन मिळाले नाही. त्यामुळे कलाकारांचा दर्जा कमी झाला. अनेक गायक, वादक, नर्तक बेकार झाले व आश्रयासाठी इकडे-तिकडे भटकू लागले.

त्यावेळी भारतात 'इंग्रजांचे मांडलिक' या नात्याने अनेक छोटी-मोठी देशी राज्ये स्थिर झाली होती. या देशी राजांच्या पदरी अनेक गायक-वादक व नर्तक यांना राजाश्रय मिळाला. अशा तऱ्हेने ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर, किराना, पतियाळा, रामपूर, इंदोर इत्यादी अनेक संस्थानातून हे कलाकार राजाश्रयाने राहू लागले.

बहुतेक कलाकार मुसलमान होते. या कलाकारांची वृत्ती अशी होती की, हे लोक आपली कला फक्त आपल्या मुलालाच किंवा आपल्या जवळच्या नातेवाईकालाच शिकवीत. पुढे काही हिंदू या मुसलमान कलाकारांकडून संगीत विद्या हस्तगत करण्यात यशस्वी झाले. याप्रमाणे त्यांचे शिष्य-प्रशिष्य निर्माण झाले व त्या त्या संस्थानांच्या नावांनी पुढे ती घराणी प्रसिद्ध झाली.



ख्यालगायकीच्या प्रतिष्ठित घराण्यांमध्ये ग्वाल्हेर घराणे सर्वात जुने मानले जाते. परंतु इतिहास दृष्ट्या पाहिले तर या गायकीचे मूळ कव्वाल बच्चांच्या घराण्यात सापडते.[१] त्या दृष्टीने सर्वप्रथम 'कव्वालबच्चांचे घराणे' या घराण्याचा इतिहास पाहणे उचित ठरते. या घराण्यांमध्ये जयपूर घराण्याचे स्वरूप दिले नाही कारण पुढच्या प्रकरणांत आपण त्या घराण्याची विस्तृत रूपाने चर्चा करणार आहोत.


---

१. अ) उत्तर हिन्दुस्तानी घरानेदार गायनपद्धती एवं वर्तमान संगीत शिक्षा प्रणाली का तुलनात्मक अध्ययन - शोधप्रबंध - श्री. सुरेश श्रीखंडे, पृ. क्र. ११५.
ब) घराण्यांच्या परंपरेत सौंदर्य कल्पनांचा आविष्कार - विद्याधर व्यास, संगीत कलाविहार, ऑक्टोबर १९८२.

## कव्वालबच्चांचे घराणे-

असे ऐकीवात आहे की, सुल्तान शमसुद्दीन अल्तमश (१२१०-१२३५) याच्या राज्यकाळात दिल्लीमध्ये सावंत व बूला नावाचे दोन बंधू राहात होते. यांपैकी एक मुका व दुसरा बहिरा होता. एकदा काही निमित्ताने त्यांना दरबारात बोलावले व गाण्यास सांगितले. या वेळची त्यांची असहाय परिस्थिती पाहून देवाला दया आली व त्याने या दोन बंधूंना आवाज दिले. तेव्हापासून हे दोघे गाऊ लागले. नंतर यांच्याच वंशजांना 'कव्वाल बच्चांचे घराणे' असे नांव प्राप्त झाले.[1]

दुसऱ्या मतानुसार - लखनऊच्या नवाब गयासुद्दीन हैदर याच्या राज्यकाळात गुलाम रसूल नावाचे गायक होऊन गेले. त्यांच्याच वंशामध्ये शक्कर खां व मख्खन खां नांवाचे दोन गायक होऊन गेले. यांच्या शक्कर खांचे सुपुत्र बडे महंमद खां हे कव्वाल बच्चांच्या घराण्याचे प्रवर्तक मानले जातात.[2]



श्री. विद्याधर व्यास यांनी आपल्या प्रबंधात खालीलप्रमाणे लिहिले आहे— सुरुवातीलाच त्यांनी १६ घराण्यांची नामावली दिली आहे, उदा.- ग्वाल्हेर, जयपूर किराना, आग्रा इत्यादी. यानंतर ते लिहितात की, वरील सोळा घराण्यांची जी नामावली आढळते, त्याचप्रमाणे ख्यालगायनाच्या सोळा विशिष्ट सौंदर्यपरंपरा आहेत की काय याचा विचार केला तर उत्तर नकारात्मक येईल असे वाटते. मग ही नामावली वाढण्याची कारणे काय असा प्रश्न उद्भवतो. याचे उत्तर असे संभवते की, सदारंगाने ख्यालनिर्मिती केली व धृपदाच्या सौंदर्यतत्त्वाचा आविष्कार ख्यालगायकीत केला. ख्यालगायनाची ही पद्धत सदारंगाने आपल्या घराण्यात चालविली नाही. परंतु कव्वालबच्चांना ही गायकी शिकवून त्यांच्या मार्फत या गायकीचा प्रचार केला. सदारंग हा तानसेनाच्या घराण्यातील वंशज होता व धृपद


---

१. अ] संगीत के घरानों की चर्चा - डॉ. सुशीलकुमार चौबे, पृ. क्र. ६३.
   ब] संगीतज्ञों के संस्मरण - प्रो. विलायत हुसैन खां, पृ. क्र. ६५.

२. संगीत के घरानों की चर्चा - सुशीलकुमार चौबे, पृ. क्र. ६३-६४.

गायकीच्या श्रेष्ठपणामुळे त्याने ख्यालगायनाचा हा प्रकार कव्वालबच्चांमार्फत लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला असावा. तेव्हा ख्यालगायनाचे जे मूळ स्वरूप प्रचारात आले ते कव्वालबच्चांपासून सुरू झाले असे मानण्यास प्रत्यवाय नाही.'

'ख्यालगायकी कव्वाल व त्यांच्या घराण्यामार्फत लोकप्रिय झाल्यावर या गायकीबद्दलचे आकर्षण कलावंतांमध्ये वाढू लागले. परंतु आता पर्यंतच्या कलावंतांच्या गायकीचा पाया धृपदगायकी हा असल्यामुळे ख्यालगायकीच्या तंत्राची समज त्यांना कव्वालबच्चांकडून घ्यावी लागली. परंतु मूलतः गाण्याची बैठक पक्की असल्यामुळे त्यासाठी त्यांना कव्वालबच्चांचे शिष्यत्व पत्करण्याची आवश्यकता नव्हती. सदारंग निर्मित ख्यालगायकीच्या स्वरूपाचे आकलन करून घेऊन त्यास स्वतःच्या प्रतिभेची जोड देऊन ख्यालगायकीचा आविष्कार आपण स्वतंत्रपणे मांडत आहोत असा देखावा निर्माण करता येणे शक्य होते. तो करून स्वतःचे वैशिष्ट्य समाजात टिकविण्यासाठी स्वतःची एक निराळी परंपरा अथवा घराणे आहे असे या कलाकारांनी दर्शविण्यास सुरुवात केली. व त्यामुळे वेगवेगळ्या घराण्यांची संख्या तितक्या मोठ्या प्रमाणात दिसू लागली.[1]




आचार्य बृहस्पती यांचे मत खालीलप्रमाणे आहे, त्यांच्याच शब्दात – 'खुसरो मुल्तान, अवध और बंगाल में रहे थे। बृजवासी तो थे ही और दिल्ली इनका कार्यक्षेत्र था। गुजरात के परिवार दिल्ली में बस ही गए थे और दक्षिण के गुणी भी आगए। इन परिस्थितीयों ने इन्द्रप्रस्थ मत को जन्म दिया – जिसमें अनेक राग भारतीय थे परन्तु जिनका वर्गीकरण ईरानी ढंग पर मुकाम पद्धति से किया गया था। ऐसे राग भी थे जो भारतीय और ईरानी रागों को मिलाकर बनाए गए थे और जिनका नाम भारतीय रखा गया था तथा ऐसे राग भी थे जिनके

1. घराण्यांच्या परंपरेत सौंदर्य कल्पनांचा आविष्कार – पंडित विद्याधर व्यास, संगीत कलाविहार – अक्टोबर १९८२.

नाम तो पुराने थे, परन्तु स्वर व्यापार से जो एक ठाठ से अन्य ठाठ में चले गए थे, जैसे बसन्त और श्री काफी ठाठ से पूरवी ठाठ में आ गए थे। भारतीय संगीत का यह नवीन संप्रदाय कव्वाल बच्चों की परंपरा कहलाया।[1]

प्रा. ग. ह. रानडे यांचे मत असे आहे की, 'खुसरोचे अनुकरण करणारे कव्वाल या नांवाने संबोधिले जातात. त्यांच्यामध्ये देखील गायक वादक झालेत. हद्दु-हस्सु खांनी ज्या बडे महंमदखांचे गाणे ऐकून आपली तयारी केली ते बडे महंमद खां देखील कव्वालच होते.'[2]

त्याचप्रमाणे डॉ. शरच्चन्द्र परांजपे यांनी देखील विविध घराण्यांची माहिती देताना गुलाम रसूल यांचा कव्वाली गायक म्हणून उल्लेख केला आहे. शक्कर खां व मख्खन खां हे गुलाम रसूल यांचेच नातू होत. त्याचप्रमाणे गुलाम रसूल यांना 'ख्याल' गायकीचे मूळ पुरुष संबोधुन पुढे असे लिहिले आहे की यांची कव्वाली बानी असून पुढे यांच्याच घराण्याला कव्वालबच्चोंचे घराणे असे म्हटले जाऊ लागले.[3]



प्रा. व्ही. आर. आठवले यांच्या मते - ख्यालगायकी ही सदारंगाच्या वेळेपासून म्हणजे १८ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून इ. स. १७५० पासून हिंदुस्थानी संगीतात दाखल झाली असे मानतात. सदारंगाच्या घराण्याने ही ख्यालगायकी स्विकारली नाही तर संगीतकारांमधील कव्वाल बच्चे या एका वर्गाने ही गायकी म्हणजे ख्यालगायन स्विकारले व लोकप्रिय केले. कव्वाल बच्चे या कलावंतांनी या गायकीला प्रतिष्ठा मिळवून दिल्यावर व ती लोकप्रिय झाल्यावर धृपद कलावंतांच्या निरनिराळ्या कुटूंबांनी ख्यालगायनाला सुरुवात केली आणि नंतर आपआपल्या स्थानावरून आपल्या गायकीला

---


१. बेंकटमखी और उसका मुस्लिम प्रभावित सम्प्रदाय - आचार्य बृहस्पती, संगीत- मे १९६९.

२. सदारंग और लखनऊ के ख्यालिये बडे व छोटे मियाबंधुओंके घराने का इतिहास - प्रा. ग. ह. रानडे, संगीत कलाविहार डिसेंबर १९५२, जानेवारी १९५३.

3. संगीत बोध - डॉ. शरच्चन्द्र परांजपे, पृ. क्र. १८७-१८८.

स्वतःच्या घराण्यांची नावे दिली. ख्यालगायकीचा विकास पाहता असे दिसून येते की ख्यालगायन स्विकारणारे कलावंत मिया अचपल, मिया गुलाम रसूल, मिया शक्कर खां, नथ्थन पीरबक्ष, बडे महंमद खां इत्यादी सर्व कव्वाल बच्चे होते. याशिवाय घराणे ही संज्ञा पण सुमारे १८६० नंतर म्हणजे ग्वाल्हेर घराण्याचे प्रवर्तक हद्दु-हस्सु खां यांच्या लोकप्रियतेनंतर रूढ झाली. तत्पूर्वी जवळ जवळ १०० वर्षे ही गायकी प्रचारात होती पण घराणी हे नांव नव्हते. तेव्हा घराणे ही कल्पना ग्वाल्हेर घराण्यापासूनच सुरू झाली असे मानण्यास प्रत्यवाय नसावा.[1]

या सर्व मतांवरून असा निष्कर्ष काढता येईल की, सदारंगाने जेव्हा ख्यालगायकी प्रारंभ केली तेव्हा सुरुवातीला किंवा नंतर ती त्याने कव्वाल बच्चांच्या तत्कालीन प्रतिनिधी गायकांना शिकविली असली पाहिजे. त्यांच्याच कव्वालांनी ती लोकप्रिय केली असेल आणि पुढे यांचीच परंपरा गुलाम रसूल यांच्या पर्यंत पोहोचत असली पाहिजे. कारण त्यांचा उल्लेख कव्वाली गायक गुलाम रसूल असा केलेला आढळून येतो. यांचेच वंशज बडे मंहमद खां हे होते. पुढे यांच्या बडे मंहमद खां यांची गायकी आत्मसात करून हद्दु-हस्सु खांनी आपले ग्वाल्हेर घराणे स्थापित केलेले दिसते. अर्थात हा देखील तर्कच आहे.



गायकीचे वैशिष्ट्य —

बडे महंमद खां यांचे संगीत शिक्षण पिता शक्कर खां व काका मख्खन खां यांचेकडे झाले. त्यानंतर त्यांनी आपल्या कल्पकतेने फिरतीच्या तानांचा आविष्कार केला. ही फिरत त्यांनी वक्र, पेचदार व मुश्कील अशी बनविली. यांच्या गाण्यात जादू होती. यांच्या वक्र व मुश्कील तानेची संपूर्ण देशात स्तुती झाली. काही कलाकारांनी यांची नक्कल करण्याचा देखील प्रयत्न केला पण यश फारच थोड्यांना मिळाले.[2]


---

१. प्रा. व्ही. आर. आठवले यांच्याशी चर्चा, दिनांक – ११।१२।८८.

२. संगीतज्ञों के संस्मरण – उ० विलायत हुसैन खां, – पृ. क्र. ६६.

बडे महंमद खां यांचे पुत्र - अमान अली खां, बाकर अली खां, मुबारक अली खां, मुनव्वर अली खां व फैयाज अली खां. हे सर्वच प्रसिद्ध झाले. बडे महंमद खां यांचे पुत्र मुबारक अली खां हे अत्यंत वक्र, मुश्कील फिरत करणारे व पेचदार गायकी गाणारे कलावंत होते असे अल्लादिया खांसाहेबांसारख्यांनी प्रांजलपणे म्हटले आहे. हे सर्वच कव्वाल बच्चांच्या घराण्याचे प्रतिनिधी मानले जातात.

या घराण्याच्या प्रसिद्ध गायकांमध्ये सादिक अली, ग्वाल्हेरच्या राजघराण्यात जन्मलेले भैय्या गणपत राव विशेष उल्लेखनीय आहेत. यांनी आपल्या घराण्याच्या गायकीशिवाय ठुमरी मध्ये देखील प्राविण्य संपादन केले होते. त्याचप्रमाणे फज़ले अली, मुजाहिर खां, रजबअली खां, दिलावर खां, हुसेन खां मीरबक्ष इ. गायक प्रसिद्ध होते.[1]



## प्रचलित घराणी -

### ग्वाल्हेर घराणे -


लखनऊ निवासी गुलाम रसूल हे एक उत्तम धृपदगायक होते. परंतु त्यांना ख्यालगायन अधिक प्रिय होते. यांचे पुत्र गुलाम नबी हे देखील ख्यालगायनात प्रवीण होते परंतु आवाज पातळ असल्याने व तानेमध्ये अधिक रुची असल्यामुळे त्यांनी टप्पा ही शैली आत्मसात करून त्यात प्राविण्य मिळविले. गुलाम रसूल यांनी आपल्या बहिणीची दोन मुलें - शक्कर खां व मक्खन खां यांना संगीताचे शिक्षण देऊन उत्तम तयार केले. शक्कर खां यांचे पुत्र बडे महंमद खां हे प्रतिभावंत कलाकार होते, व ग्वाल्हेर दरबारात नोकरी करीत होते. मक्खन खां यांना दोन पुत्र कादरबक्ष व पीरबक्ष. कादरबक्ष देखील बडे महंमद खां यांच्याप्रमाणेच उच्च गायक होते, व ग्वाल्हेर दरबारातच नोकरी करीत होते. पीरबक्ष हे लखनऊ दरबारात नियुक्त होते. कादरबक्षांना तीन मुले होती - हद्दु खां, हस्सु खां व नत्थु खां. नत्थु खां यांना त्यांचे चुलते पीरबक्ष यांनी दत्तक घेतले होते. कादर बक्षांच्या मृत्यूनंतर पीरबक्षांनीच हद्दुखां

---

१. संगीतज्ञों के संस्मरण - उ. विलायत हुसेन खां, पृ. क्र. ७१-७२.

व हस्सु खां यांना संगीत शिक्षण दिले व दोघांनाही संगीतात प्रवीण केले. त्यानंतर एका मैफलीमध्ये या दोघा बंधूंनी बडे महंमद खां यांना, त्यांची गायकी त्यांनाच ऐकवून आश्चर्यचकित केले. याच मैफलीमध्ये हस्सु खांचा[1] मृत्यू कडक बिजली नांवाची तान घेताना १८५० मध्ये झाला.

हद्दु खां, हस्सु खां व नत्थु खां या तिघांपैकी हद्दु खां यांचे व्यक्तीमत्व सर्वात जास्त प्रभावशाली होते. ग्वाल्हेर गायकीवर धृपदाचा प्रभाव असल्यामुळे त्यांच्या गायकीत गांभीर्य व सुरेलपणा प्रतीत होई. याशिवाय बडे महंमद खां यांची वक्र तानेची फिरत देखील दिसून येई. रागविस्तार, शब्दरचनेचे लालित्य व त्यांचे कलायुक्त उच्चारण, स्थाई अंतरा यांची तालबद्ध बंदिश यांशिवाय मींड, सूत, गमक इत्यादी सर्व प्रकारांनी हद्दु खां आपली गायकी सजवत. या सर्व कारणांमुळेच यांची गायकी अत्यंत प्रभावी बनली होती.[2]



हद्दु खां यांच्या शिष्यांमध्ये - यांचे पुत्र महंमद खां व भूगंधर्व रहिमत खां, भाचे निसार हुसेन खां व मेंहदी हुसेन खां, याव्यतिरिक्त पंडित बाबा दीक्षित, पं. बाला गुरू, बन्ने खां, नजीर इत्यादी प्रसिद्ध झाले. हद्दु खां यांचा मृत्यू १८७५ मध्ये झाला.

हस्सु खांच्या शिष्यपरंपरेत - पुत्र गुले इमाम, वासुदेव जोशी, बडे बाळकृष्णबुवा इत्यादी प्रसिद्ध झाले. नत्थु खां यांचे शिष्य निसार हुसेन खां हे होत.

निसार हुसेन खां यांच्या शिष्यपरिवारात - पं. रामकृष्णबुवा वझे, गणपतराव पंडित, शंकरराव पंडित, एकनाथ पंडित इत्यादी. शंकरराव पंडितांच्या शिष्यपरंपरेत - पंडित राजाभैय्या पूंछवाले, पुत्र कृष्णराव पंडित, काशीनाथ मुळे, भैय्या मालवणकर इत्यादी उल्लेखनीय आहेत.

---

१. मध्यप्रदेश में शास्त्रीय संगीत - कृष्णराव शंकर पंडित, लक्ष्यसंगीत सप्टेंबर १९५८.

२. संगीत के घरानों की चर्चा - सुशीलकुमार चौबे, पृ. क्र. ८४.

पंडित वासुदेवबुवा जोशी यांचे शिष्य बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचा शिष्य परिवार बराच मोठा आहे. यांच्या शिष्यपरंपरेत - पुत्र अण्णाबुवा इचलकरंजीकर, शिष्य गुण्डूबुवा इंगळे, मिराशीबुवा, अनंत मनोहर जोशी व विष्णू दिगंबर पलुस्कर इत्यादी होते.

पं. पलुस्करांच्या शिष्यपरंपरेत - पं. विनायकबुवा पटवर्धन, पं. ओंकारनाथ ठाकुर, नारायणराव व्यास, बा. र. देवधर, वामनराव पाध्ये इत्यादींचा समावेश होतो.


पं. विनायकबुवा पटवर्धन यांची शिष्यपरंपरा - पं. डी. व्ही. पलुस्कर, पं. नारायणराव पटवर्धन, श्रीमती सुनंदा पटनाईक इ. येतात.

पं. ओंकारनाथ ठाकुर यांच्या शिष्यपरंपरेत - प्रेमलता शर्मा, पद्माकर बर्वे, यशवंतराय भट इत्यादी.

पं. कृष्णराव पंडित यांच्या शिष्यपरंपरेत - लक्ष्मण पंडित, चंद्रकांत पंडित, शरच्चन्द्र अरोलकर इत्यादी.

या घराण्याचे वर्तमान गायक - श्री विद्याधर व्यास, सौ. मालीनी राजूरकर, पं. नारायणराव पटवर्धन, लक्ष्मण पंडित, यशवंत जोशी इत्यादी.

गायकीची वैशिष्ट्ये -




या घराण्यात स्वर आकारयुक्त व खुला असा लावला जातो. यात कोणतीही कृत्रिमता नसते. आवाज चोरून गाणे या घराण्यात निषिद्ध मानले आहे. रागातील बंदिश सुरू करण्यापूर्वी एक दोन रागवाचक आलाप घेऊन रागातील बंदिश सुरू करतात. ख्याल सुरू केल्यावर अस्ताई दोन वेळा व अंतरा एकदा म्हणण्याचा ग्वाल्हेर घराण्यातील गायकांचा प्रघात आहे. अस्ताई अंतरा गाऊन झाल्यावर त्यानूनच बंदिशीच्या अंगाने रागाची बढत सुरू होते. रागाची बढत काही गायक आकारात करतात. पण वर्तमान काळात बहुतेक गायक रागाची बढत बोलआलापांनीच करतात. मध्य षड्जापासून तार सप्तकातील षड्जापर्यंत एक एक स्वर घेऊन आलाप करतात. नंतर अंतरा सुरू करून अंतऱ्याचे आलाप घेतात. यानंतर स्थाई वरील बोलअंग व शेवटी तानबाजी. सरळ, सपाट

व दाणेदार तान या घराण्याचे वैशिष्ट्य आहे. तान लयीनुसार घेतली जाते. या तानांमध्ये एक प्रकारचा क्रम असतो. सरळ, तीन सप्तकी, पल्लेदार तान या गायकीचा विशेष होय.

विलंबित ख्याल संपल्यावर त्याच रागातील द्रुत चीज सुरू करतात. त्यात थोडे जलद आलाप, ताना व बोलताना घेतात. त्याचप्रमाणे फिरतीच्या ताना घेतात. आणि शेवटी वाढलेल्या लयीत राग संपवतात. ग्वाल्हेर घराण्याची गायकी सरळ व साधी आहे. सर्व सामान्य श्रोत्यांना रूचेल व समजेल असेच तिचे स्वरूप आहे.

या गायकीला आलापप्रधान, तानप्रधान, लयकारीप्रधान किंवा स्वरप्रधान गायकी म्हणू शकत नाही. कारण या गायकीत, गायकीची सर्वच अंगे आली आहेत. त्यामुळे ग्वाल्हेर गायकीला आपण 'अष्टांग गायकी' असे म्हणू शकतो.



या घराण्यांत बहुतेक प्रचारातील राग गातात. उदा. यमन, भैरव, बहार, सारंग, भूप, कामोद इत्यादी. या घराण्यात सदारंग-अदारंग यांच्या चिजा प्रामुख्याने गातात. विलंबित ख्यालाच्या ठेक्याची लय इतर घराण्यांच्या मानाने जलद असते. विलंबित ख्याल तिलवाडा, त्रिताल, झूमरा, एकताल इ. तालांत गातात.


टप्पे, तराणे, चतुरंग, त्रिवट, इत्यादी शास्त्रीय गीतप्रकार सुद्धा या घराण्यातील गायक गातात. या घराण्यांत ठुमरी गाइली जात नाही. ग्वाल्हेर घराण्याची गायकी सर्वांगपरिपूर्ण अशी मानली जाते.

## किराना घराणे -

किराना हे उत्तर भारतातील एक गांव आहे. या गावाच्या नावावरूनच या घराण्याचे नांव किराना असे पडले. सुप्रसिद्ध बीनकार मरहुम उस्ताद बंदेअली खां यांना या घराण्याचे आद्य आचार्यपद दिले जाते. किराना घराण्याची कीर्ती सर्वतोमुखी होण्यास, तिचा प्रचार आणि प्रसार करण्यास तसेच किराना

घराण्याची इतर नामवंत घराण्यांत गणना करण्यास व या घराण्याचे प्रतिनिधीत्व स्वीकारून संगीत कलेच्या साम्राज्यांत महत्त्वाची क्रांती घडवून आणण्यास अब्दुल करीम खां हेच कारणीभूत झाले आहेत. यामुळेच विद्वानांच्या दृष्टीने किराना घराण्याचे जनक अब्दुल करीम खां हेच ठरतात.

अब्दुल करीम खां यांचे शिक्षण वडील काले खां व चुलते अब्दुल्ला खां यांचेकडे झाले. किराना घराण्याचे ख्यालगायक अब्दुल रहमान खां यांच्याकडून त्यांनी ख्यालगायनाचे विशेष शिक्षण घेतले. सुप्रसिद्ध बीनवादक सादिक अली आणि त्यांचे पुत्र बंदे अली खां हे किराना घराण्याचेच कलाकार होते. बंदे अली खां हे ग्वाल्हेर घराण्याचे हद्दु खां यांचे जावई होते. हे स्वतः उत्तम ध्रुपदगायक होते. कोल्हापूर दरबारचे प्रसिद्ध सारंगीवादक हैदर खां यांचे शिष्य होते. अब्दुल करीम खां यांचे गुरु अब्दुल रहमान खां या घराण्याच्याच शिष्य परंपरेतील होत.




अब्दुल करीम खां यांचेशिवाय या घराण्याचे प्रतिनिधीत्व करणारे दुसरे गायक वहीद खां हे होत. यांनी किराना गायकीचे शिक्षण त्यांचे काका हैदर खां (कोल्हापूरचे) यांचेकडून घेतले.

अब्दुल करीम खां यांच्या शिष्यांमध्ये सवाई गंधर्व, बेहरे बुवा, रोशनआरा बेगम, कपिलेश्वरीबुवा इ. प्रसिद्ध झाले. स्व. पद्मश्री हिराबाई बडोदेकर व स्व. सुरेशबाबू माने यांनी वहीद खां यांचेकडे तालीम घेतली होती.

सवाई गंधर्व यांच्या शिष्य परंपरेत - श्रीमती गंगूबाई हनगल, बसवराज राजगुरू व पं. भीमसेन जोशी यांचे नांव भारतभर प्रसिद्ध आहे. स्व. कागलकरबुवा व फिरोज दस्तुर हे देखील सवाई गंधर्व यांचेच शिष्य होत. श्रीमती माणिक वर्मा, या घराण्याच्या प्रसिद्ध गायिका आहेत. स्व. सुरेशबाबू माने यांच्या शिष्या श्रीमती प्रभा अत्रे या प्रसिद्ध आहेत.

गायकीचे वैशिष्ट्य –

किराना घराण्याची गायकी मुख्यत: तंत अंगाची आहे. तंत अंग याचा संगीतातील अभिप्रेत अर्थ बीन अंग असा आहे. 'ताल गया सो बाल गया, सुर गया तो सिर गया' अशी या गायकीची प्रतिज्ञा आहे. या गायकीत स्वरांचे स्थान अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे. या घराण्याची गायकी स्वरप्रधान आहे. स्वरांमध्ये काकू प्रयोग या घराण्याचे वैशिष्ट्य आहे. यामुळेच या घराण्यात ठुमरी गायन अधिक प्रचलित झाले. आलापीमध्ये चैनदारी व भावप्रधानता यामुळे या घराण्याची गायकी ठुमरी शैलीसाठी अनुकूल अशीच आहे. या गायकीत लयकारीला विशेष स्थान नाही.




अब्दुल करीम खां यांनी मींड व कणयुक्त गायकीला जास्त प्राधान्य दिले. गायकीत नवनिर्मिती करण्यासाठी त्यांनी अनेक कलाकारांचे गाणे ऐकून आपली गायकी अधिकाधिक प्रभावशाली बनविण्याचा प्रयत्न केला. आपल्या आलापप्रधान गायकीला मींड व कणांनी सजवून गायकीतील सूक्ष्म जागा त्यांनी स्पष्टपणे दाखविल्या. या घराण्याची गायकी मुख्यत: आलापप्रधान असल्याने आलापकाम व्यवस्थित करता येईल, असेच राग ते निवडतात. वक्र किंवा अनवट राग हे गायक सहसा निवडत नाहीत. यमन, तोडी, ललित, मुल्तानी, दरबारी, शुद्ध कल्याण, अभोगी, मालकंस, पूरिया, जोगीया, मारू बिहाग, बिहाग, दरबारी कानडा इत्यादी राग जास्त प्रमाणात गातात.

किराना घराण्यातील गायकीचा स्वर हाच आत्मा आहे. घराण्याचे वैशिष्ट्य म्हणजे स्वरांचा सुरेलपणा आणि चैनदारी. मुळात बीनकारांचे घराणे असल्यामुळे त्यांच्या गायकीत मींड, घसीट इत्यादी प्रकारांना महत्त्वाचे स्थान आहे. या गायकांना तानांपेक्षा आलापीतच अधिक रस वाटतो, त्यामुळे ताना मर्यादीत स्वरूपातच घेतात. या घराण्याचे वर्तमान गायक पं. भीमसेन जोशी, श्रीमती माणिक वर्मा, श्रीमती प्रभा अत्रे, श्रीमती आशा पारसनीस इत्यादी.

# आग्रा घराणे-

हे घराणे मुख्यत: धृपद- धमार गायकांचे आहे. या घराण्याचा आरंभ अलखदास आणि मलूकदास यांच्यापासून मानला जातो. अलखदास यांचे पुत्र सुजान खां हे उत्कृष्ट धृपदगायक होते. मलूकदास यांना दोन पुत्र होते. सरसरंग आणि शामरंग. यांपेकी सरसरंग यांना अपत्य नव्हते. शामरंग यांना चार पुत्र- जंगू खां, सस्सु खाँ, गुलाब खां व खुदाबक्ष. खुदाबक्ष लहानपणी गेंगाणे होते म्हणून त्यांचे नांव घग्गे असे पडले. पुढे ते घग्गे खुदाबक्ष म्हणून ओळखले जाऊ लागले. असे म्हणतात की, यांची गाण्यात प्रगती होईना म्हणून ते चिडून घराबाहेर पडले व थेट ग्वाल्हेर येथे आले. येथे नत्थन पीरबक्ष[1] यांच्याजवळ त्यांनी पुष्कळ वर्षे तालीम घेतली. आणि विद्या संपन्न झाल्यावर ते आग्रा येथे परत गेले.



आग्र्याला परत आल्यावर त्यांनी स्वत:चे दोन पुत्र गुलाम अब्बास खां आणि कल्लन खां व शेर खां (जंगू खां यांचे पुत्र) यांना तालीम दिली. यांच्या व्यतिरिक्त अली बक्ष खां भरतपूरवाले, आणि पं. विश्वनाथ यांचे पुत्र पं. शिवदीन यांनाही तालीम दिली.

गुलाम अब्बास खां यांनी मूळ ग्वाल्हेर गायकी स्वरूपात थोडा बदल केला. लयकारीयुक्त तानेची फिरत आणि बोलअंगात देखील लयकारीला विशेष प्राधान्य दिले. जयपूरचे यांचे एक प्रसिद्ध शिष्य कल्लन खां होते. कल्लन खां अत्यंत विद्वान, उत्तम संगीतशिक्षक होते. दुसरे शिष्य नत्थन खां हे होते. नत्थन खां हे गुलाम अब्बास खां यांचे भाचे व विलायत हुसैन खां यांचे पिता होते. पं. भास्करबुवा बखले हे नत्थन खां यांचे शिष्य होते. विलायत हुसैन खां यांच्या शिवाय नत्थन खां यांचे पुत्र महंमद खां व अब्दुल्ला खां हे होते. दोघेही प्रसिद्ध गायक होते. गुलाम अब्बास खां यांच्या प्रमुख शिष्यांमध्ये


---

1. संगीत बोध - डॉ. शरच्चन्द्र परांजपे, आग्रा घराना तालीका - पृ.क्र.१०१.

बडोदा येथील स्व. फैयाज खां हे होते. फैयाज खां हे खरे रंगीले घराण्याचे होते परंतु त्यांचे मातुल घराणे हे आग्रा घराण्यातच होते. फैयाज खां प्रसिद्ध गायक होऊन गेले.[1]

या घराण्याच्या शिष्यपरंपरेत अनेक प्रसिद्ध गायक झाले. स्व. फैयाज खां यांच्या शिष्यांमध्ये - श्रीकृष्ण नारायण रातांजनकर, दिलीपचंद्र बेदी, अताहुसैन, सोहनसिंह इत्यादी.

विलायत हुसैन खां यांच्या शिष्यांमध्ये - स्व. जगन्नाथबुवा पुरोहित, पं. राम मराठे, पं. गजाननबुवा जोशी, रत्नकांत रामनाथकर इ. पंडित रातांजनकर यांच्या शिष्यांमध्ये - श्रीमती सुमती मुटाटकर, श्री. गौंडे इत्यादी. लताफत हुसैन खां देखील प्रसिद्ध गायक आहेत. हे तसद्दक हुसैन व विलायत हुसैन खां यांचे शिष्य आहेत.



पं. भास्करबुवा बखले यांचे शिष्य मास्तर कृष्णराव, बालगंधर्व इत्यादी. याशिवाय खादीम हुसैन, इसाफल हुसैन इ. प्रसिद्ध गायक आग्रा घराण्याचे प्रतिनिधी आहेत.

१ आग्रा घराण्याची उत्पत्ती मूलत: ग्वाल्हेर घराण्यातूनच झाली आहे. या गायकीवर धृपदधमार गायकीचा विशेष प्रभाव आहे. या गायकीत लयकारीला अतिशय प्राधान्य आहे.

येथे एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. स्व. भास्करबुवा बखले यांनी ग्वाल्हेर गायकीचे शिक्षण फैज महंमद खां यांचेकडे घेतले होते. आग्रा घराण्याच्या गायकीचे शिक्षण नत्थन खां यांचेकडे घेतले होते. यानंतर त्यांनी खांसाहेब अल्लादिया खां यांचेकडे जयपूर गायकीचे शिक्षण घेतले. याप्रमाणे स्व. भास्करबुवा बखले यांनी ग्वाल्हेरची साधी सरळ गायकी, आग्रा घराण्याची लयप्रधान गायकी व जयपूर घराण्याची सूक्ष्म व पेचदार गायकी एकत्र करून नवनिर्मिती करण्याचा प्रयत्न केला.


---

१. हमारा आधुनिक संगीत - सुशीलकुमार चौबे, पृ. क्र. २८.

गायकीचे वैशिष्ट्य—

घग्गे खुदाबक्ष यांच्या पूर्वीचे आग्रा घराण्याचे गायक धृपद-धमारच गात. परंतु त्यांच्या नंतरचे गायक ख्याल गाऊ लागले. या गायकीचे वर्णन श्री. वा. ह. देशपांडे यांनी असे केले आहे की, 'या घराण्यातील गायकांची आवाज लावण्याची पद्धत अनुनासिक व रेकून अथवा खरडून लावण्याची आहे. यांच्या गायकीत आक्रमकपणा दिसून येतो.'[1]

श्री. विद्याधर व्यास यांचे, या गायकीबद्दलचे मत असे— 'मुबारक अली खां (कव्वालबच्चांचे घराणे) यांना ऐकून त्यांच्या गायकीमधील पेंचदार व मुश्कील भाग उचलून चिजांच्या बोलअंगाच्या सौंदर्याचा आविष्कार ख्यालाच्या समग्र मांडणीत एकजिनसीपणाने करून एक नवीन घराणे अथवा सौंदर्यप्रणाली नत्थन खां यांनी उत्पन्न केली. म्हणजे असे की, चिजांचे बोल घेऊन आलाप बोलअंगाने पण आकाराने न घेता म्हणावयाचे. लयीच्या बोलताना व नंतर बोलअंगानेच ताना घ्यावयाच्या हा क्रम नत्थन खां यांनी रूढ केला. अर्थात आलाप, बोल व तान या ख्यालीच्या समग्र मांडणीच्या स्वरूपाला धक्का न लावता हे तीनही भाग बोलअंगानेच व्यक्त करायचे, अशी कल्पना नत्थन खां यांनी मांडली. म्हणजेच बोल अंगाच्या सौंदर्य कल्पनेचा ख्यालगायनाच्या मांडणीत एकजिनसीपणाने आविष्कार त्यांनी केला.'[2]



या घराण्याचे गायक राग सुरू करताना सुरुवातीला नोम-तोम आलापी द्वारे रागस्वरूप स्पष्ट करून विलंबित ख्याल सुरू करतात. लयीच्या अंगाने बोलआलाप घेतात. या घराण्यात ताना अतिशय जलद गतीत नसतात परंतु त्या ताना लयकारीयुक्त सरळ व पल्लेदार असतात. यांचे अस्ताई अंतरे ताल अंगाने चुस्त असतात. यांची गायकी लयप्रधान आहे. या घराण्यात विशेष रूपाने नट-बिहाग,

---

१. घरंदाज गायकी - वा. ह. देशपांडे, पृ. क्र. १९.


२. घराण्यांच्या परंपरेत सौंदर्य कल्पनांचा आविष्कार - विद्याधर व्यास, संगीत कलाविहार १९८२.

नंद, गौडमल्हार, धनाश्री, जोग, बिलावल, नटप्रकार, खट, मेघ, कान्डा इत्यादी राग गाइले जातात.

वर्तमान काळात या घराण्यातील प्रमुख गायक डॉ. सुमती मुटाटकर, पं. गींडे, पं. भट, पं. दिनकर कायकिणी, युनूस हुसेन, बबनराव हळदणकर इत्यादी आहेत.

## पतियाळा घराणे—

विशेषकरून स्व. बडे गुलामअली खां. यांच्या मुळे संपूर्ण भारतात पतियाळा घराणे प्रसिद्ध आहे. कालू खां प्रसिद्ध सारंगीवादक होते. यांचे पुत्र अलीबक्ष. अलीबक्ष व फतेहअली हे दोघे तानरस खां यांचे शिष्य होते. पुढे हेच दोघे अलीया–फत्तू या नांवाने ओळखले जात. या अलिया–फत्तूनी दिल्ली घराण्याचे तानरस खां यांच्याशिवाय लखनऊ घराण्याचे महम्मद खां व मुबारकअली खां व जयपूरचे बहराम खां आणि ग्वाल्हेरचे हद्दू खां यांचेकडून तालीम घेतली. त्यामुळे यांच्या गायकीमध्ये 'दिल्ली–जयपूर–ग्वाल्हेर' या तीनही घराण्यांचे सुंदर मिश्रण आढळते. बडे गुलामअली हे अलीबक्ष यांचे पुत्र व आशिकअली यांचे भाऊ होते.



या घराण्यात पूर्वीपासूनच सारंगी वादन चालत आले होते. सुरुवातीला स्व. बडे गुलामअली खां हे देखील सारंगी वाजवित. पुढे हे उत्कृष्ट ख्यालगायक म्हणून प्रसिद्ध पावले. ख्यालाबरोबरच ठुमरी गायनांत देखील ते पारंगत होते. यांचे बंधू उ० बरकत अली खां हे देखील ठुमरी गायनासाठी विशेष प्रसिद्ध होते.

यांच्या शिष्यपरंपरेत – यांचे पुत्र मुनव्वरअली खां, तसेच तुलसीदास, प्रसन्नकुमार बॅनर्जी, मीरा बॅनर्जी, संध्या मुखर्जी इत्यादी. यांच्या गायकीचा प्रभाव अनेक गायकांच्या गायकीवर दिसून येतो.

वास्तविक पाहता पतियाळा घराणे हे दिल्ली घराण्याचीच शाखा आहे. पण पंजाबमधील स्थानिक शैलींचा प्रभाव पडल्यामुळे हे

1. संगीत बोध – शरच्चन्द्र श्रीधर परांजपे, पृ. क्र. १८९-१९०.

पंजाबचे घराणे म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे हे पतियाळा येथे विस्तार पावले, म्हणून याला पतियाळा घराणे असे म्हटले जाऊ लागले.[१]

गायकीचे वैशिष्ट्य —

या गायकीत स्वर व लय यांचे समान महत्त्व दिसून येते. आवाजाचा लगाव देखील शुद्ध स्वरूपाचा असा आहे. या गायकीचे वैशिष्ट्य भावात्मकता हे आहे.[२] गमक अंग, तराना गायकी व अतिद्रुत लयीमध्ये संचार करणारी सपाट तान या घराण्याचे वैशिष्ट्य होय.[3] अलिया-फत्तु स्थीत ठुमरी रचना आज देखील प्रसिद्ध आहे. या घराण्याचे वर्तमान गायक स्व. बडे गुलामअली खां यांचे पुत्र उ० मुनव्वर अली खां (हे नुकतेच दिवंगत झाले), मीरा बॅनर्जी, पं. जगदीशप्रसाद, अजय चक्रवर्ती इत्यादी.

## दिल्ली घराणे —

या घराण्याच्या स्थापने बाबत दोन मते आढळतात. एक असे की, मोंगल बादशहाच्या पदनाजर तानरस खां यांनी या घराण्याची स्थापना केली. आणि दुसरे या घराण्याचे प्राचीनत्व. त्यानुसार दिल्ली शहर जेव्हा वसले तेव्हापासून ते भारताची राजधानी राहिले आहे. आणि जेथे सम्राट राहतो, तेथेच विद्या, कला व कलाकारांचे केंद्र असते. दिल्लीमध्येच महम्मदशहा रंगीलेच्या दरबारात सदारंग व अदारंग यांनी ख्यालगायकीला उच्च स्थान प्राप्त करून दिले. यांनी आपल्या वंशजांना ध्रुपदगायकी शिकविणेच पसंत केले. परंतु शिष्यांना मात्र ख्यालगायकीचीच तालीम दिली. त्यानंतर यांच्या शिष्य-प्रशिष्यांनी ही ख्यालगायकी पुढे आणली. या मताचे समर्थक उ० चांद खां यांच्या मतानुसार दिल्ली घराणे हे सर्व घराण्यांमध्ये प्राचीन आहे.


---

१. संगीत बोध – शरच्चन्द्र परांजपे, पृ. क्र. १८९-१९०.
२. घरंदाज गायकी – वा. ह. देशपांडे, पृ. क्र. ६८.
३. संगीत बोध – शरच्चन्द्र परांजपे, पृ. क्र. १९१.

तानरस खां यांचे खरे नांव कुतुबबक्ष असे होते. यांनी मिया अचपल यांच्याकडून संगीत शिक्षण घेतले. यांचे पुत्र उमराव खां हे देखील उत्तम ख्यालगायक होते. तानरस खां यांचे नातू अब्दुल रहीम खां, भाचे शब्बू खां व अजीज खां या घराण्याचे प्रसिद्ध गायक होते.[1]

दिल्लीचे जे कलाकार दिल्लीमध्येच राहून ख्यालगायकी वाढवीत होते, त्यांमध्ये मिया अल्लाबक्ष व त्यांचे बंधू उमर खां (यांना अल्ला-उमरा म्हणत), नन्हे खां, संगी खां, सम्मन खां, मम्मन खां व प्रसिद्ध सारंगीवादक स्व. बुन्दु खां यांची नांवे प्रमुख आहेत.

अल्लाह हुसैन, अमीर हुसैन, गफ्फासिंह, मस्तान सिंह, निसार हुसैन आग्रेवाले, उ. चांद खां, उस्मान खां, नसीर अहमद, हिलाल अहमद, जहूर अहमद इ. या घराण्याचे प्रसिद्ध कलाकार होत.



गायकीचे वैशिष्ट्य—

या घराण्यात विविध प्रकारच्या ताना घेण्याचा प्रचार आहे. उदा.— झूला तान, जोड-तोड की तान, फन्दे की तान, सवाल-जवाब की तान इत्यादी. यांच्या ताना कठीण व क्लिष्ट असतात, व नांवे देखील विचित्र असतात. यांच्या विलंबित लयीच्या ख्यालात पालकीचे ख्याल, सवारीचे ख्याल, परीचे ख्याल इत्यादी काही नांवे प्रसिद्ध आहेत.

विलंबित ख्यालासाठी तिलवाडा, झूमरा, सवारी इत्यादी ताल उपयुक्त मानले जातात. मध्यलयीच्या ख्यालांसाठी फरोदस्त, आडचौताल इत्यादी. तानांचा विविधपणा व क्लिष्टपणा यांमुळे दिल्ली घराणे वेगळे ओळखू येते.

---


१. संगीत में घराने - कमलेश सक्सेना, अप्रकाशित शोधप्रबंध पृ.क्र. ४५.

## अप्रचलित घराणी –

### गोखले घराणे –

पंडित महादेवबुवा गोखले हे गोखले घराण्याचे प्रवर्तक मानले जातात. मूळांत हे रत्नागिरीचे होत. वयाच्या १२व्या वर्षी इ. स. १८३१-च्या आसपास हे संगीत शिकण्यासाठी घराबाहेर पडले व मीरज, सातारा येथून थोडे संगीत शिक्षण ग्रहण करून त्यांचे सहाध्यायी पं. अंतुबुवा आपटे यांच्याबरोबर हैदरबाद येथे बडे मिया व छोटे मिया (जैनुल अबदिन खां व मुजफ्फर खां) यांच्या कडे गेले. १२ वर्षे पं. महादेवबुवांनी त्यांच्येकडे तालीम घेतली.

पं. महादेवबुवांच्या चार पुत्रांपैकी मोठे पं. गणपतीबुवा व छोटे कृष्णबुवा त्यावेळी संगीत विद्वान समजले जात. पं. गणपतीबुवांचे पुत्र पं. सदाशिवबुवा या घराण्याचे सर्वश्रेष्ठ गायक मानले जातात. इ. स. १९४८ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.



पं. कृष्णबुवांचे पुत्र विश्वनाथबुवा यांचेजवळ बंदिशींचा उत्तम संग्रह होता. धारवाड कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. जठार यांनी पं. कृष्णबुवांकडून तालीम घेतली.

या घराण्यातील बरीच रागस्वरूपे प्रचलित स्वरूपांहून बरीच भिन्न अशी आहेत. या गायकीमध्ये प्रचलित व अप्रचलित दोन्ही राग गाण्याची प्रथा होती. गायनात ध्रुपद अंग प्रमुख होते. तालामध्ये आड-कुआड, अतीत-अनागत इ. लयकारींचे प्रकार अत्यंत कुशलतेने केल्या जात.[1] परंतु आज हे घराणे जवळ जवळ लुप्त झाले आहे.

### भेंडीबाजार घराणे –

या घराण्याचा प्रारंभ मुरादाबादचे प्रसिद्ध सारंगीवादक उ. छज्जू खां यांच्यापासून मानला जातो. यांचे दोन बंधू खादिम हुसैन व नजीर खां. हे इनायत हुसैन खां यांचे शिष्य होते.[2]

---


१. संगीतांतील घराणी – ना. र. मारुलकर पृ. क्र. १०९.

२. संगीतज्ञों के संस्मरण – विलायत हुसैन खां. पृ. क्र. १६७.

छज्जू खां यांचे पुत्र अमानअली खां यांनी संगीत शिक्षण आपल्या वडिलांजवळून घेतले. आपल्या पारंपारिक गायकीला त्यांनी नवे वळण दिले, यामुळेच या घराण्याचे प्रवर्तक उ. अमानअली खां मानले जातात.[१] यांचा परिवार मुरादाबादहून मुंबई येथील भेंडीबाजार नावाच्या ठिकाणी स्थायिक झाला; म्हणून यांच्या घराण्याला भेंडीबाजार हे नांव पडले.[२]

उ. छज्जू खां व त्यांचे बंधू नजीर खां हे उत्तम गायक होते. उ. छज्जू खां स्वत: रचना करीत तर नजीर खां आलापी उत्तम करीत. खादिम हुसैन खां देखील उत्तम गवई होते. या तिघांचाही प्रभाव उ. अमानअली यांच्यावर पडला व त्यातूनच त्यांनी नव्या गायकीला जन्म दिला.[3] या घराण्याची गायकी मेरूखंडावर आधारलेली आहे.[४]

मेरूखंड गायकी मूळांत गणित पद्धतीची आहे. उदा. तीन स्वरांचे गणितागत पद्धतीने होणारे सहा प्रकार व चार स्वरांचे होणारे २४ प्रकार याप्रमाणे. गायनामध्ये मेरूखंडाचा प्रत्यक्ष प्रयोग करताना रागसौंदर्याच्या दृष्टीने योग्य प्रकारालाच महत्व देणे आवश्यक आहे. परंतु या घराण्याबद्दल असे मत आहे की, ही मेरूखंड प्रक्रिया करताना या गोष्टींकडे या गायकांचे विशेष लक्ष नसते.[५]



उ. अमानअली खां यांचा भर बहुतेक द्रुताकडे झुकणाऱ्या मध्यलयीवरच असे. स्वर लावण्याची पद्धत अगदी नाजूक व त्यांत एक प्रकारची मनोहर लचक व लडिवाळपणा असे. यामुळे त्यांची मध्यलयीतली चीज सुरू झाली की एखाद्या शुभांगीच्या नृत्यासारखीच वाटे इतकेच नव्हे तर या घराण्यापैकी कोणाचेही गायन ऐकले तर त्यांची संगीतविषयक धारणाच नृत्यात्मक आहे असे वाटते.[६]

---

१. पं. रमेश नाडकर्णी – मदनलाल व्यास, संगीत – अक्टोबर १९८५.
२. पं. रमेश नाडकर्णी – मदनलाल व्यास, संगीत – अक्टोबर १९८५.
३. पं. रमेश नाडकर्णी – मदनलाल व्यास, संगीत – अक्टोबर १९८५.
४. घरंदाज गायकी – वा. ह. देशपांडे, पृ. क्र. ८०.
५. घरंदाज गायकी – वा. ह. देशपांडे, पृ. क्र. ८०.
६. घरंदाज गायकी – वा. ह. देशपांडे, पृ. क्र. ८०-८१.

यांच्या प्रमुख शिष्यांमध्ये पं. शिवकुमार शुक्ल (बडोदा), अंजनीबाई मालपेकर, रमेशचन्द्र नाडकर्णी, डॉ. वसंतराव देशपांडे इत्यादी होत. इंदोर घराण्याचे संस्थापक उ. अमीर खां यांनी, याच गायकीतून प्रेरणा घेऊन आपली शैली तयार केली.[1]


उ. अमानअली खां यांचे शिष्य पं. जानोरीकर. पं. जानोरीकर यांची शिष्या - सुहासिनी कोरटकर.

पं. रमेश नाडकर्णी यांच्या शिष्यांमध्ये सौ. शैलजा पिंपळापुरे यांचे नांव उल्लेखनीय आहे.

## इंदोर घराणे—

उस्ताद अमीर खां यांना या घराण्याचे संस्थापक मानतात. यांचे शिक्षण वडील शाहमीर खां यांचेकडे झाले. उ. शाहमीर खां यांनी भेंडीबाजार घराण्याचे सारंगीवादक उ. छज्जू खां, उ. नजीर खां व उ. खादिम हुसैन खां यांचेकडे तालीम घेतली होती.[2]

उ. अमीर खां यांच्या गायकीवर देवासचे उ. रजबअली खां, इंदोरचे उ. नसीरुद्दीन खां, उ. रफीक खां, उ. मुराद खां, व अमानअली खां इ. चा प्रभाव पडला. या घराण्याची गायकी मुख्यत: मेरुखंड पद्धतीनेच प्रभावित आहे.



त्याचप्रमाणे अमीर खां यांच्या गायकीवर किराना घराण्याचे अब्दुल वहीद खां यांच्या गायकीची गडद छाया दिसते. यांची गायकी स्वराकडेच झुकणारी म्हणजे स्वरप्रधान आहे. यामुळेच आलापचारी करण्यास मुबलक वाव असेल असेच राग बहुधा निवडले जातात. उदा.— शुद्धकल्याण, तोडी, दरबारी, ललित, मालकंस इत्यादी.

यांची प्रत्यक्ष शिष्यपरंपरा जरी दिसत नसली तरी अमीर खां यांच्या गायकीचा वर्तमान काळात तरुण गायकवर्गावर व श्रोत्यांवर जो प्रभाव पडला आहे, त्यानुसार अमीर खां यांची गायकी

---


१. घरंदाज गायकी - वा. ह. देशपांडे, पृ. क्र. ८१.

२. इंदोर घराणे - कमल बंदोपाध्याय, संगीत - डिसेंबर १९७६.

ख्यालगायनात युगप्रवर्तक अशी सिद्ध झाली आहे. यामुळे हे घराणे मानावे किंवा नाही असा प्रश्न पडतो, कारण घराणे सिद्ध व्हायला कमीत कमी तीन पिढ्यांचे सातत्य हवे. परंतु अमीर खां यांनी आपली वैयक्तिक शैली बनविली होती, त्याचा ही आधार अब्दुल वहीद खां यांच्या गायकीत होता हे स्पष्ट दिसून येते.

यांच्या शिष्यपरंपरेत - पंडित अमरनाथ, पं. श्रीकांत बाकरे, अजित सिंह पेण्टल, पूरबी मुखर्जी इ. वर्तमान गायक आहेत.

यांचे घराणे मूळ तंतकारांचेच. अमीर खां यांचे वडील शाहमीर खां प्रसिद्ध सारंगिये होते. अमीर खां देखील सारंगी वाजवित. यामुळे सूक्ष्म कण लावण्याचे प्राबल्य यांच्या गायकीत दिसून येते. अब्दुल वहीद खां यांच्या प्रभावामुळे खांसाहेबांची गायकी किराना गायकीकडेच झुकलेली वाटते.



या घराण्याची गायकी स्वरांच्या शुद्धीने सुस्नावलेली अशी आहे. या गायकीचे अनुयायी रागातील स्वरांची बढत सावकाश करतात. विलंबित रचनेमध्ये शांत व गंभीर वातावरण तयार होते. द्रुत रचनांमध्ये कठीण व पेचदार ताना घेतात, त्याचप्रमाणे पेचदार सरगम या गायकीचे वैशिष्ट्य आहे. अमीर खां यांनी आपल्या गायनशैलीमध्ये लयीबद्दल एक क्रांती घडवून आणली. त्यांनी ख्यालाची लय इतर घराण्यांच्या तुलनेत अतिविलंबित अशी ठेवली, ज्यामुळे संथ आलापी सुकर होईल. तालांमध्ये झूमरा तालालाच प्राधान्य दिले. त्यांच्या अतिविलंबित लयीमुळे सुद्धा त्यांची गायनशैली स्वतंत्र ओळखली जाते, इंदोर घराण्याचे हे देखील एक वैशिष्ट्यच मानावे लागेल. ख्यालाची लय इतरांच्या तुलनेत अतिविलंबित केल्यामुळे चंचल प्रकृतीच्या रागांना उदा.- बहार, गौडमल्हार इ., ही लय सुसंगत वाटत नाही असा अनुभव आहे.[1]

---


१. प्रो. वसंत रानडे यांचेशी चर्चा, दिनांक ११।८।८८.

**सहसवान घराणे** – हे घराणे ग्वाल्हेरची उपशाखा मानली जाते. ग्वाल्हेर घराण्याचे गायक उ. हद्दु खां यांचे जावई व शिष्य इनायत हुसैन खां यांच्यापासून या घराण्याचा उदगम मानला जातो.[1]

इनायत हुसैन खां हे ख्याल व तराणे उत्तम गात व रचना देखील करीत. प्रथम यांनी हद्दु खां यांचेकडे संगीत शिक्षण घेतले व नंतर रामपूरचे बहादुर हुसैन खां यांचे हे शिष्य झाले.[2]

या घराण्याच्या गायकीचे स्वरूप ग्वाल्हेर गायकीसारखेच आहे. या घराण्यात इनायत हुसैन खां, इमदाद खां, हैदर खां, मुश्ताक हुसैन खां व निसार हुसैन खां इ. प्रतिभाशाली कलाकार झाले.[3]

इनायत हुसैन खां यांच्या शिष्यांमध्ये स्व. रामकृष्णबुवा वझे, छज्जू खां, नजीर खां, खादिम हुसैन, मुश्ताक हुसैन खां इत्यादी प्रसिद्ध गायक झाले.[4]



फिदा हुसैन खां यांचे पुत्र निसार हुसैन खां यांच्या गायनाने प्रसन्न होवून महाराज सयाजीराव गायकवाड (बडोदे) यांनी निसार हुसैन खां यांना आपल्या दरबारात नियुक्त केले. परंतु नंतर त्यांनी ही नोकरी सोडली.[5] यांचे पुत्र सरफराज हुसैन देखील चांगले कलाकार आहेत. निसार हुसैन खां यांचे जावई हाफीज अहमद खां हे देखील याच घराण्याचे प्रसिद्ध गायक आहेत.

**रामपूर घराणे** –

या घराण्याची परंपरा रामपूरच्या नवाबांपासूनच चालत आली आहे. कारण रामपूरचे नवाब संगीताचे शौकीन तर होतेच शिवाय ते संगीताचे अभ्यासक देखील होते. नवाब युसुफ अली खां हे संगीताचे


---

१. The Musical Heritage of India - Dr. M.R. Gautam, P. 115.
२. संगीतज्ञों के संस्मरण - विलायत हुसैन खां, पृ. क्र. १६८.
3. The Musical Heritage of India - Dr. M.R. Gautam, P. 115.
४. संगीतज्ञों के संस्मरण - विलायत हुसैन खां, पृ. क्र. १६९-७०.
५. संगीतज्ञों के संस्मरण - विलायत हुसैन खां, पृ. क्र. १६९-७०.

अभ्यासक व रसिक होते. यांचे दोन पुत्र कल्बेअली खां व हैदरअली खां हे दोघेही संगीतात निपुण होते. कल्बेअली खां यांच्या दरबारात ग्वाल्हेरच्या शक्कर खां यांचे पुत्र बडे महम्मद खां व अहमद खां यांचा सत्कार केला गेला. अहमद खां यांचे वंशज रामपूरच्या दरबारांतच राहिले.[1]

हैदरअली खां यांचे भाचे नवाब हामिदअली खां देखील उत्तम संगीतज्ञ होते. हैदरअली खां यांचे दोन पुत्र छम्मन साहेब (सआदत अली खां) आणि जानी साहेब (महम्मद अशफाक अली खां) हे देखील उत्तम कलाकार होते. छम्मन साहेब हे सूरसिंगार वाद्यांत प्रवीण होते.[2]

वजीर खां बीनकार हे रामपूर दरबाराचे श्रेष्ठ संगीतज्ञ होते. वडील अमीर खां यांच्याप्रमाणेच वजीर खां हे एक कुशल वादक तर होतेच शिवाय उत्तम गायक देखील होते. हे नवाब हामिदअली यांचे गुरु होते. यांना संगीत शास्त्राचे देखील उत्तम ज्ञान होते. यांच्या प्रमुख शिष्यांमध्ये - उ. अल्लाउद्दीन खां व हाफिज अली खां - सरोद वादक, मेंहदी हुसेन खां - धृपद व ख्यालगायक, मुश्ताक हुसेन खां - ख्यालगायक, फिदा हुसेन - ख्यालगायक इत्यादी झाले.[3]



फिदा हुसेन यांच्या शिष्यांमध्ये निसार हुसेन खां, व निसार हुसेन खां यांच्या शिष्यांमध्ये - हफीज अहमद, गुलाम मुस्तफा - खां, सरफराज हुसेन इ. प्रसिद्ध झाले. स्व. मुश्ताक हुसेन खां यांची शिष्या श्रीमती सुलोचना बृहस्पती या रामपूर घराण्याच्या वर्तमान गायिका आहेत.

पं. भोलानाथ भट यांच्यावर रामपूर घराण्याचा प्रभाव होता. हे ख्याल, टप्पा, ठुमरी, दादरा उत्तम गात. श्रीमती सुलोचना बृहस्पती, माणिक वर्मा इ. यांच्या प्रमुख शिष्या आहेत.[4]


आचार्य बृहस्पती यांच्या मते - रामपूरच्या राजवंशापासूनच सदारंग व त्यांच्या परंपरेचा घनिष्ट संबंध राहिला आहे. या वंशाचे

१. ख्याल शैली का विकास - मधुबाला सक्सेना, पृ. क्र. १८१-१८२.
२. ख्याल शैली का विकास - मधुबाला सक्सेना, पृ. क्र. १८२.
3. संगीत के घरानों की चर्चा - सुशीलकुमार चौबे, पृ. क्र. ५७-५८.
४. खुसरो, तानसेन और अन्य कलाकार - सुलोचना बृहस्पती, पृ. क्र. १५०.

नवाब हैदरअली यांचेकडून उ० वजीर खां यांनी गायनाचे शिक्षण घेतले, व ते या विद्येत पारंगत झाले. हेच उ० वजीर खां स्व. पं. भातखंडे, हाफिज अली खां व मेहरचे उ० अलाउद्दीन खां यांचे गुरू होते.[1]

याप्रमाणे आचार्य बृहस्पतींनी पं. भातखंडे यांचा रामपूरशी संबंध दाखविला आहे. पं. भातखंडे हे रामपूरचे नरेश स्व. नवाब हामिद अली खां यांचेही गंडाबंद शिष्य होते.[2]

सदारंग - अदारंग या परंपरेचे एक गायक बहादुर हुसैन खां (हे बदायूं जिल्ह्यातील सहसवान येथील राहणारे होते.) हे बासत खां यांचे पुत्र होते. बहादुर खां यांचे भाचे व जावई अमीर खां व अमीर खां यांचे पुत्र वजीर खां हे पं. भातखंडे यांचे गुरू होते.[3]



बहादुर हुसैन खां यांनी ख्याल गायनांत अनेक शिष्य तयार केले. त्यांनी इनायत खां यांना ख्यालगायनाचे शिक्षण दिले व यांचे भाऊ हैदरअली हुसैन यांना वीणेचे शिक्षण दिले. इनायत खां यांच्या पित्याचे नांव महबूब खां व आजोबांचे नांव फतहअली असे होते. हे लखनौचे नवाब वाजिदअली शाह यांचे वजीर होते. १८५६ मध्ये इनायत खां वयाच्या नवव्या वर्षी रामपूर येथे आले. व त्यांनी बहादुर हुसैन खां यांचेकडे संगीत शिक्षणाला सुरुवात केली. नंतर भ्रमण करता करता हे ग्वाल्हेर येथे पोहोचले. तिथे हद्दु खां यांनी गाण्यावर प्रसन्न होऊन आपल्या मुलीचा विवाह त्यांच्याशी करून दिला, व त्यांना गाण्याचे शिक्षण देण्यास सुरुवात केली. इनायत खां हे धृपद, ख्याल, टप्पा, ठुमरी इ. उत्तम गात.


यांच्या प्रमुख शिष्यांमध्ये उ० मुश्ताक हुसैन खां - रामपूर (इनायत खां चे जावई), उ० फिदाहुसैन खां - बडोदा, उ० हैदर हुसैन खां - रामपूर, उ० हफीज खां - म्हैसूर, उ० अमानअली खां इत्यादी.

---

१. बहार बसन्त - बसन्त बहार - आ. बृहस्पती, संगीत मार्च १९६९.
२. संगीत चिन्तामणि - आ. बृहस्पती एवं सुमित्राकुमारी, पृ. क्र. ६०८.
३. रामपूर परंपरा और स्व. पं. भातखंडे - श्रीमती सुमित्रा आनन्दपाल सिंह, संगीत नवंबर १९६६.

**खुर्जा घराणे-** या घराण्याची परंपरा मैदू खां यांच्यापासून सुरू होते. त्यांच्यानंतर दायम खां व कायम खां हे प्रसिद्ध कलाकार झाले. १८ व्या शतकात नत्थे खां यांचे पुत्र जोधे खां या घराण्यातील प्रसिद्ध संगीतज्ञ झाले. शिमरोन गढ च्या नवाबांनी यांच्या गायनावर प्रसन्न होऊन यांना आपल्या दरबारात नियुक्त केले. शेवटी हे खुर्जा येथे स्थायिक झाले. यांचा पुत्र इमाम खां याने आपल्या पित्याकडून संगीताचे शिक्षण घेतले. त्याचप्रमाणे शहाब खां यांच्याकडेही तालीम घेतली. नंतर हे रामपूरचे नवाब कल्बे अली खां यांच्या दरबारात नियुक्त झाले. यांचे पुत्र गुलाम हुसेन खां हे ठाकोर येथे होते नंतर खुर्जा येथेच स्थायिक झाले.

गुलाम हुसैन खां यांना तीन पुत्र- जहूर खां, गफूर बक्ष खां, व गुलाम हैदर खां. जहूर खां हिंदी व फारसी मध्ये कविता करीत. हिंदी कवितेत रामदास व फारसी[illegible] आकिल हे त्यांचे उपनाव होते. हे धृपद व ख्याल उत्तम गात. यांनी रचलेली धृपदे, ख्याल, होरी, सादरे, चतरंग, त्रिवट व सरगम प्रसिद्ध आहेत.



गफूरबक्ष खां हे उत्तम सतारवादक होते. त्याचप्रमाणे शायरी देखील उत्तम करीत. गुलाम हैदर खां यांनी संगीताचे शिक्षण, वडील गुलाम हुसेन खां व वडील बंधू जहूर खां यांचेकडे घेतले. गफूर बक्ष यांना अपत्य नव्हते. जहूर खां यांचे पुत्र अल्ताफ हुसैन खां देखील रचना करीत. जहूर खां यांचे पुत्र अलताफ हुसैन खां यांच्या प्रसिद्धीमुळेच खुर्जा घराणे हे श्रोत्यांसमोर स्पष्ट झाले.


या गायकीत ख्यालाचे चार भाग असतात. यांच्या गायकीत मुर्कीचा प्रयोग कमी होतो. आज या घराण्याचे स्वतंत्र अस्तित्व दिसत नाही.[1]

---

१. खुर्जा घराने के राष्ट्रपति पुरस्कार प्राप्त उ० अल्ताफ हुसैन खां के पुत्र श्री. महमंदवाहिद हुसैन खां से एक भेट — भगवतशरण शर्मा, संगीत मे १९९२.

**मेवाती घराणे-** हे घराणे उ. घग्गे नजीर खां यांपासून मानले जाते. यांचे दोन शिष्य चिमनलाल व नाथूलाल हे होते. चिमनलालजींच्या अकाली निधनामुळे नाथुलालजीने देखील गाणे सोडून दिले. त्यांनी आपले भाचे पं. मोतीराम यांना तालीम दिली. पं. मोतीराम यांचा कंठ मधूर होता. त्यांना आपल्या मामाकडून सात वर्षे तालीम मिळाली. त्यानंतर थोड्याच दिवसात नाथूलाल यांचा मृत्यू झाला.

यानंतर पं. मोतीराम सहारनपूर येथे राहू लागले. तेथेच त्यांनी आपले लहान बंधु पं. ज्योतीराम यांना संगीत शिक्षण दिले. ~~स्कू~~ ~~स्कू~~ या दोघांनी ज्योती-मोती या नावाने ख्याती प्राप्त केली. नंतर राजा प्रतापसिंहाच्या दरबारात दोघेही काश्मीर येथे गेले. तेथून मुंबई येथे गोकुलदास महाराज (वल्लभ संप्रदाय) यांच्याजवळ तीन वर्षे राहिले. वर्धा येथील शंकरराव पंडित मेघे हे पंडितजींचे शिष्य होते. यांच्याजवळ दोघेही बंधू अकरा वर्षे राहिले. अंतीम समयी पं. मोतीराम यांनी आपला पुत्र पं. मणीराम यांच्या हातात तानपूरा दिला व त्याला हैदराबाद येथील निजामाच्या दरबारात गाण्यासाठी पाठविले. या वंशाचे चार प्रसिद्ध गायक- स्व. पं. मणीराम, पं. प्रतापनारायण, पं. जसराज, व पं. ज्योतीरामजींचे पुत्र पं. पुरनचंद्र.[1]



मेवाती घराण्याच्या वैशिष्ट्यांबद्दल पं. जसराज यांचे मत असे की, स्वर, कण, गमक, अलंकार, मूर्च्छना यांबरोबरच काव्य व शब्दांचे स्पष्ट उच्चारण या गायकीच्या सफलतेची कारणे आहेत.[2]

पं. जसराज आधुनिक पिढीचे गायक असल्यामुळे त्यांचे विचार प्रगतीशील आहेत. या गायकीमध्ये सर्वच घराण्यांची वैशिष्ट्ये एकत्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. उदा:- किराना घराण्याची आलापचारी, पतियाळा घराण्याची तान इ. परंतु आज या घराण्याचा शिष्यसंप्रदाय तितका विकसित झालेला दिसत नाही. या गायकीचे वर्तमान गायक सोम तिवारी, कंकना बॅनर्जी, गीरीश वझलवार, पद्मजा फेणाणी इत्यादी आहेत.

---

१. मेवाती घराना - सोम तिवारी, संगीत अगस्त १९५६.
२. सौतन के घर जइए - गोपीकुमार कौशल, संगीत अगस्त १९७९.